नवी आशा, नवी दिशा

# बसवंत उद्यानातील वैशिष्ट्यपूर्ण ‘मधमाशी संवर्धन प्रकल्प’






- मधमाशी पालन केंद्रस्थानी ठेवून, सृष्टिचक्राचे संतुलन आणि पर्यावरण रक्षणाचे महत्त्व कल्पकतेने समजावून देणारा विस्तीर्ण परिसर
- कृषिविकासासाठी साध्य करावयाची पीकवाढ तसेच मध आणि आनुषंगिक उत्पादनांसाठी मधमाशी पालनाची आवश्यकता सांगण्याकरिता सचित्र फलकांचा वापर
- मधमाश्यांचे विविध प्रकार, त्यांची शिस्तबद्ध कार्यपद्धती यांची माहिती देणाऱ्या ‘टेक्निकल टनेल’ची उभारणी; यातून सर्वसामान्य नागरिकांचं मनोरंजक पद्धतीनं प्रबोधन
- शेतकऱ्यांसाठी भरघोस पिकाची शाश्वती, मध आणि इतर मधमाशीजन्य घटकांपासून युवा पिढीतील मधपाळांना रोजगारसंधी. त्याचप्रमाणे आरोग्याच्या दृष्टीने मधाचे महत्त्व अधोरेखित करणारी कल्पक मांडणी
- पर्यटकांना तीन जातींच्या मधमाश्यांची सविस्तर माहिती देण्यासाठी मधुबनाची निर्मिती; येथे नागरिकांना मधमाश्या जवळून बघता तसेच हाताळताही येतात
- विद्यार्थी आणि शेतकऱ्यांसाठी मधमाशी पालनाचे शास्त्रीय प्रशिक्षण देण्याची सुविधा; तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच प्रात्यक्षिकांसाठी अद्ययावत साधनसामग्री

बसवंत मधमाशी उद्यान (मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक) हे खासगी औद्योगिक आस्थापनेने उभारलेले केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील पहिले मधमाशी उद्यान आहे. मधमाशी पालनाला चालना मिळावी व निसर्गातील मधमाश्यांचे संवर्धन व्हावे या उद्देशाने उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे. तसे बघता बसवंत मधमाशी उद्यानाची स्थापना ५ जून २०१८ रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या औचित्याने झाली होती. मात्र 'कोविड' संकटाच्या काळात मधमाशी उद्यान पर्यटकांसाठी बंद होते. या दरम्यान बसवंत मधमाशी उद्यानामध्ये मधमाशी संवर्धनासाठी वेगवेगळ्या सुविधा, उपक्रमांचे नियोजन



करण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

* सर्वसामान्य लोकांना मधमाश्यांचे सृष्टी संरक्षणातील, कृषी उत्पादन वाढीतील आणि मानवी आरोग्यातील महत्त्व कळावे याकरिता चित्रफीत, लघुपट व 'टेक्निकल टनेल'ची निर्मिती करण्यात आली आहे.

* मधमाशी पालन, मधमाश्यांचे प्रकार तसेच मधासह मधमाश्यांपासून मिळणारे विविध पदार्थ, परागीभवन, मध उत्पादन या विषयांचे स्वतंत्र प्रदर्शन तयार केलेले आहे.

* सर्व स्तरातील लोकांमध्ये मधमाश्यांविषयी आवड निर्माण होऊन, त्यांच्याविषयी असलेली सर्वसामान्यांच्या मनातील भीती दूर करण्याकरिता मधुबनाची निर्मिती केली आहे. या मधुबनात तीन प्रजातींच्या वसाहती बघायला व हाताळायला ठेवलेल्या आहेत.

* बसवंत मधमाशी उद्यानाच्या माध्यमातून 'मधमाश्यांचे गाव' ही संकल्पना मांडण्यात आलेली आहे. या संकल्पनेमध्ये मधमाश्यांना उपयुक्त अशा खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामातील पिकांची निवड करण्यात आलेली असून; प्रत्यक्ष मधमाशी पालन करत असताना बाराही महिने मधमाश्यांना फुलोरा कसा उपलब्ध होईल याचे मॉडेल तयार करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना ही संकल्पना खूप उपयोगी पडणार आहे.

* मधमाश्यांना उपयुक्त अशी नऊ प्रकारची फुलझाडे, पिके व वनस्पतींची निवड करून रोपवाटिका तयार करण्यात आलेली आहे. मधमाश्यांना त्यांचे खाद्य सर्वत्र उपलब्ध व्हावे व या माध्यमातून निसर्गातील मधमाश्यांची संख्या जास्तीत जास्त वाढावी, असा यामागील हेतू आहे.

* शहरातील व जंगलातील आग्या मधमाश्यांचे संवर्धन व्हावे या उद्देशाने 'डॉरसाटा पॉईंट'ची उभारणी केली आहे. यामध्ये पारंपरिक पद्धतीमध्ये मध काढताना मधमाश्यांचा व त्यांच्या मोहोळाचा कसा ऱ्हास होतो किंवा मोहोळ कसे नष्ट होतात हे दाखविले आहे. त्याचबरोबर नवीन शास्त्रीय पद्धतीने मध व मोहोळ काढल्यास मधमाश्यांना कशाप्रकारे वाचविता येते हे प्रात्यक्षिकाद्वारे दाखविण्यात आलेले आहे.

* शहरी मधमाशी पालनाविषयीचे एक प्रात्यक्षिक मॉडेल देखील येथे तयार करण्यात आले आहे. या माध्यमातून शहरी भागामध्ये मधमाशी पालन कसे करता येते हे दाखविण्यात आले आहे.

अशा प्रकारे मधमाशी संवर्धनाकरिता बसवंत मधमाशी उद्यानामध्ये वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. सर्वांनी बसवंत मधमाशी उद्यानाला भेट देऊन या प्रकल्पांची पाहणी करावी. आपल्या शेतामध्ये व परिसरामध्ये असे उपक्रम राबवून मधमाशी संवर्धनाला साह्य करावे. कृषिविकास, सृष्टिसंवर्धनाला हातभार लावावा. बेरोजगार युवकांनी या केंद्रातून मधमाशी पालनाचे शास्त्रीय प्रशिक्षण घेऊन मध, पोलन, रॉयल जेली, बी व्हेनम आणि मेण या मौल्यवान पदार्थांच्या निर्मितीतून अर्थार्जन करावे.

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**